


दिनांक ३१ ऑगस्ट 2023 रोजी स्किलेट्झ फाउंडेशन, सूक्ष्म आणि लघु उद्योग मंत्रालय (MSME) आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'उद्योजकता विकास ' या विषयावर आधारित एक जागरूकता कार्यक्रम घेण्यात आला होता. कार्यक्रमाचे शीर्षक अन्नप्रक्रिया आणि या संबंधित व्यवसाय असे होते. सूक्ष्म आणि लघु उद्योग मंत्रालय, मुंबई चे सहाय्यक संचालक मा. श्री. अभय दप्तरदार आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कुलगुरू मा. डॉ. गीताली टिळक यांच्या मार्गदर्शनाने या कार्यक्रमाचे आयोजन केले गेले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या हॉटेल मॅनेजमेंट विभागाच्या प्रमुख मा. डॉ. सुवर्णा साठे यांनी केले. पहिल्या सत्रामध्ये इंडो कंपासच्या मा. रूपा कानविंदे यांनी अन्नप्रक्रिया व्यवसायात लागणारे परवाने, खाद्य पदार्थ उद्योगात येणाऱ्या अडचणी या बद्दल विशेष माहिती दिली. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात पंतप्रधान सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेचे, जिल्हा समन्वयक मा. श्री शिरीष मांढरे यांनी अन्नप्रक्रिया व्यवसायात दिल्या जाणाऱ्या सरकारी योजनांची प्रक्रिया आणि याचा लाभ कोणाला घेता येईल याविषयी माहितीपूर्ण सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या शेवटी कौशल्य विकास आणि उद्योजकता याविषयी ४ सप्टेंबर रोजी सुरू होणाऱ्या कार्यशाळेविषयी स्किलेट्झ फाउंडेशनच्या संस्थापिका डॉ. मिताली मोरे यांनी माहिती दिली. या कार्यक्रमासाठी स्किलेट्झ फाउंडेशनच्या संस्थापिका सीए. सोनाली सारीपल्ली आणि श्रुती पाटोळे यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हॉटेल मॅनेजमेंट विभागाचे तिसऱ्या वर्षाचे विद्यार्थी आणि स्किलेट्झ फाउंडेशन संघातील भाग्यश्री पुणेकर यांनी केले तर कार्यक्रमाला उपस्थित महिलांची मुलाखत आणि मनोगत वनमाला चौधरी यांनी घेतले. कार्यक्रमासाठी स्किलेट्झ फाउंडेशनच्या संस्थापिका एड. गौरी चंद्रायन आणि एड. वृषाली प्रधान यांनी मार्गदर्शन दिले होते. कार्यक्रमाला चार राज्यांमधून १०० हून अधिक प्रतिनिधींनी उपस्थिती लावली होती.